महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वाइंडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / फंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटसॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ७७ वा | सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ना कोणत्या पक्षावर ना कोणत्या चिन्हावर मोहोळची निवडणूक मतदारांच्या मनावर

## कोण गुलाल उधळणार ? आणि कोण घरी बसणार ?

### मोहोळ नगरपरिषद रणधुमाळी — भाग एक

**मोहोळ (साहिल शेख):-** मोहोळ नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षण प्रक्रियेचा झटका बसल्याने शहरातील अनेक दिग्गज आता नगराध्यक्ष पदाची स्वप्ने विसरून किंगमेकर होण्याच्या तयारीत आहेत. काही किंगमेकर निवडणुकीच्या रिंगणाबाहेर राहून सूत्रे सांभाळणार आहेत तर काही किंगमेकर स्वतःच निवडणूक लढवून नगर परिषदेतील आपले अस्तित्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करणार आहेत.

जसा काळ बदलला तसा राजकारणाची व्याख्या बदलली आणि निवडणुकीचीही. एकेकाळी पुढील प्रमाणे स्तर असायचे. हाय कमांड त्यानंतर वरिष्ठ नेते त्यानंतर स्थानिक नेते त्यानंतर कार्यकर्ते त्यानंतर समर्थक आणि त्यानंतर मतदार. आता अलीकडच्या काळातील नव्याने समाविष्ट झालेला स्तर म्हणजे कोणतेही पक्ष धोरण नसलेले, सामाजिक भान नसलेले, केवळ राजकारणात काहीतरी मिळतेय म्हणून केवळ आभासी भूमिकेत राहून सबस्क्राईब शेअर लाईक आणि कमेंटचा पाऊस पाडून घेणारा एक आभासी कार्यकर्ता घटक बनला आहे.

ग्रामपंचायत लोप पावुन नगर परिषदेची स्थापना झाल्यानंतर नगरसेवक म्हणजे एक स्टेटस सिम्बॉल बनल्यामुळे त्यावेळी नगरसेवक होण्यासाठीची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली. ग्रामपंचायत कालावधीमध्ये देखील ग्रामसेवकांना हाताशी धरून दप्तर घरी नेऊन मागच्या तारखेचे बांधकाम परवाना वाटणाऱ्या अनेक सरपंच, उपसरपंचांनी नगरपरिषद निवडणुकीचा खर्च काढला. काही कायम इच्छुक नगरसेवक राहिले तर काही नगरसेवक बनले. सुरुवातीच्या काही कालावधीमध्ये नगरसेवक केवळ एकमेकांच्या तोंडाकडे बघत अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून प्रशासन व्यवस्थेचा आणि ठेकेदारी कार्यपद्धतीचा अभ्यास करू लागले. सुरुवातीच्या काळात आलेल्या अधिकाऱ्यांनी नगरसेवकांना फारसे साक्षर न करण्याची भूमिका घेतल्यामुळे ठेकेदारीची व्यवस्था आणि कामे मंजूर करून आणण्याची ती पूर्ण करण्याची आणि बिले काढण्याची सिस्टीम कळण्यासाठी नगरसेवकांना नंतरचे अडीच वर्ष लागली. मोहोळ शहरातील कानाकोपऱ्यातील काँक्रीटचे रस्ते गटार कामे पेव्हर ब्लॉक त्याचबरोबर अंतर्गत सुशोभीकरण देखील झाले. विशेष म्हणजे काही नगरसेवकांनी आपला प्रभाग अद्यावत आणि विकासकामाने समृद्ध बनवला देखील. त्यामुळे स्थानिक मतदारांना नगरपरिषदेत जाण्याची वेळ आली नाही. ज्या ज्या नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातील संपर्क कायम ठेवत मतदारांना विश्वासात घेत चांगली कामे केली. त्यांना आता पुन्हा कोणत्याही नव्या जाहीरनाम्याची अथवा पब्लिसिटी प्रपोगंडा करण्याची गरज उरली नाही.

पक्ष गट तट सत्ता राजकारण चिन्ह, उजवा, डावा समर्थक, विरोधक या गोष्टी होतच राहतील. मात्र शहरातील सुजाण मतदारांना आपल्या प्रभागात काम करणारा नगरसेवक हा सुशिक्षित, चांगल्या वैचारिक धोरणाचा, चांगली विचारधारा मनामध्ये असलेला, प्रशासन स्तरावर उत्तम समन्वय असलेला, शिवाय सर्वधर्मसमभाव आणि जातीय सलोखा बंधुता राखणारा असावा असे वाटणे साहजिक आहे. तरीही आरक्षण सोडतीनंतर जातीची समीकरणे आणि कोणत्या समूहाला अनुकूल वातावरण आहे कोणत्या समाजाचे मतदान कोणत्या बाजूने जाईल याचे आडाखे बांधत होणारी मतदानाची रणनीती निश्चितपणे मनाला विचार करायला लावणारे आहे.




सुरुवातीपासूनच हि निवडणूक कोणत्या पक्षाच्या मुद्द्यावर, कोणत्या चिन्हावर, कोणत्या जाती धर्मावर, कोणत्या विकासाच्या मुद्द्यावर लढली जाणारच नाही, तर ही निवडणूक लोकांना रुचणाऱ्यांना विजयी करणारी, लोकांना खुपणाऱ्यांना पाडणारी, आणि लोकांना टोचणाऱ्यांना डिपॉझिट जप्त करायला लावणारी ठरणार आहे.

आजही शहरात काही चांगले नगरसेवक असे आहेत त्यांना पक्षापुढेच काय मात्र मतदारापुढे देखील हात जोडायची गरज नाही. कारण त्यांनी वेळोवेळी ऊन पावसात दिवस रात्र सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाण्याची भूमिका तर घेतलीच, मात्र प्रापंचिक खर्चातील चार दोन पैसे देखील प्रभागातील सर्वसामान्यांच्या हितासाठी खर्चण्याची जी दानत दाखवली आहे ती दानतच त्यांना या निवडणुकीत सर्वात कमी खर्चात निवडून यायला फायदेशीर ठरणार आहे.

## स्व. आबासाहेबांच्या बंगल्यावर म्हणजेच तालुक्याच्या न्याय मंदिरावर हल्ला - आ. बाबासाहेब देशमुख

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** स्व. आमदार गणपतराव देशमुख यांच्या घरावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ शनिवारी (ता. ११) सांगोला तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील सर्वच व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली होती.

यावेळी झालेल्या मोर्चामध्ये सर्वपक्षीय नेते मंडळी सामील होऊन त्यांनी घटनेचा निषेध नोंदविला.

या निषेध मोर्चामध्ये बोलताना आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले, दिवाळीच्या तोंडावर बंदची हाक देणे उचित नव्हते, परंतु लोकांच्या भावना तीव्र असल्याने हा निर्णय झाला. स्व. आबासाहेबांच्या बंगल्यावर म्हणजेच तालुक्याच्या न्याय मंदिरावर हल्ला झाला आहे. हा सांगोला तालुक्याच्या इतिहासातील न पुसणारा काळा डाग आहे. ज्यांनी आमच्या न्याय मंदिरावर हल्ला केला आहे त्याला पोलिसांनी ताबडतोब शोधून काढावे. परंतु त्याचे नाव जाहीर न करता त्याला समज देऊन सोडावे. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माझ्या विविध सहकारी आमदारांनी या घटनेचा निषेध नोंदवीत आम्ही तुमच्या सोबत असल्याचेही आमदार डॉ. देशमुख यांनी सांगितले.

डॉ. अनिकेत देशमुख यांनी सांगितले, "गणपतराव देशमुख यांची वास्तू ही तालुक्याच्या विकासाची साक्ष आहे. गेल्या साठ वर्षांत कोणीही तिथे एक खडा फेकला नाही. ही घटना तालुक्याच्या सुसंस्कृत राजकारणाला काळी छाया देणारी आहे. ज्यांचे जे कर्म आहे, ते त्यांना भोगावे लागेल.

मोर्चात ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड, अतुल पवार, तुषार इंगळे, नंदकुमार शिंदे, अरविंद केदार, कल्पना शिंगाडे, किरण सरगर आदींची उपस्थिती होती. बंददरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद घुगे यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

### व्यापाऱ्यांचा कडकडीत बंद



### स्व. आबांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक

शुक्रवारी (ता. १०) स्व. गणपतराव देशमुख यांच्या निवासस्थानी अज्ञाताने दारूची बाटली फेकून हल्ला केला होता. शनिवारी सकाळी नऊ वाजता कार्यकर्त्यांनी स्व. 'भाई' गणपतराव देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक करून परिसरात गोमूत्र शिंपडून स्वच्छता केली. त्यानंतर महात्मा फुले चौक ते तहसील कार्यालय असा निषेध मोर्चा काढण्यात आला. 'भाई गणपतराव देशमुख अमर रहे', 'हल्ला करणाऱ्यांचा निषेध असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## केंद्र व राज्याचा निर्णय विद्यार्थीविरोधी

**पोखरापूर (कटूसत्य वृत्त):** महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी धक्कादायक बातमी समोर आली आहे. बार्टी, महाज्योती, सारथी आणि टार्टी या संस्थांच्या माध्यमातून पूर्वी वढरउ आणि MPSC सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मोठ्या प्रमाणात मोफत कोचिंग वर्ग तसेच शैक्षणिक भत्त्याच्या माध्यमातून सहाय्य दिले जात होते. मात्र, सरकारने नियुक्त केलेल्या गुप्ता समितीच्या अहवालानंतर या संधींवर गदा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गुप्ता समितीच्या शिफारसीनुसार आता UPSC साठी सर्व चार संस्थांकडून मिळून केवळ १०० जागा ठेवण्यात येणार आहेत. याआधी या संस्थांमार्फत UPSC साठी सुमारे २००० जागा उपलब्ध होत्या. त्याचप्रमाणे MPSC साठी पूर्वी २५०० जागा असताना आता त्या केवळ ४०० जागांवर आणण्यात आल्या आहेत.

पूर्वी प्रत्येक संस्थेकडे साधारणतः ६०० जागा उपलब्ध असत, ज्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना मोफत कोचिंग आणि आर्थिक मदत मिळत होती. पण गुप्ता समितीच्या शिफारसींमुळे या सर्व संधींवर मोठा गदा येऊन विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे राज्य प्रवक्ता प्रशांत बोराडे यांनी केला आहे.

'ही धोरणं थेट विद्यार्थ्यांच्या भविष्यास धक्का देणारी आहेत. स्पर्धा परीक्षांमध्ये मागासवर्गीय, ओबीसी, अनुसूचित जाती-जमाती आणि अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी या संस्था आशेचा किरण ठरल्या होत्या. पण सरकार प्रेरित या समितीच्या शिफारसींमुळे ते भविष्य अंधारात ढकललं जात आहे,' असं बोराडे म्हणाले.

त्यांनी पुढे सांगितलं की, 'सरकारचा हा विद्यार्थीविरोधी निर्णय तात्काळ मागे घेतला नाही, तर विद्यार्थी रस्त्यावर उतरतील आणि तीव्र आंदोलन उभारले जाईल.'

## दोन कोटींची फसवणूक करणारा भोंदूबाबा जेरबंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जमिनीतून गुप्तधनाचा हंडा काढून देतो असे म्हणून १ कोटी ८७ लाख ३१ हजार ३०० रुपये रोख रक्कम घेऊन फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबाला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले आहे.

मोहम्मद कादरसाब शेख ऊर्फ साहेब ऊर्फ महाराज (वय ४०) असे फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबाचे नाव आहे. याबाबत गोविंद (पान 2 वर..)



मल्लिकार्जुन वंगारी (रा. सोलापूर) यांनी फसवणूकबाबत पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडेही तक्रारी अर्ज केला होता.

यात गोविंद वंगारी यांना राहत्या घरामधून गुप्तधनाचा हंडा काढून

निरामय पॅरालिसिस सेंटर
ISO 9001:2015
NGO DARPAN
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## लहान मुलांसाठी खेळणी व खुली व्यायाम शाळाचे काम पुर्ण

### प्रभागाला विकासाचे रोल मॉडेल बनवणाऱ्या दत्तात्रय खवळे हेच पुन्हा लढणार



**मोहोळ (साहील शेख):-** मोहोळ शहराच्या पूर्व भागातील महत्त्वाचा प्रभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि नवीन प्रभाग रचनेनुसार झालेल्या प्रभाग क्रमांक चार हा आता विकसित प्रभाग म्हणून शहरात ओळखला जात आहे.

सहकार परिषदेचे अध्यक्ष राज्यमंत्री ना.राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार यशवंत माने यांच्या निधीतून या प्रभागामध्ये लहान मुलांसाठी खेळणी व खुली व्यायाम शाळाचे काम पूर्ण करण्यात आले. याशिवाय अद्यावत रस्ते, पाणीपुरवठा, वीज तसेच आरोग्यविषयक सोयी सुविधांसाठी परिपूर्ण असलेला हा प्रभाग आता मोहोळ शहरातील सर्वाधिक विकसित प्रभाग म्हणून ओळख निर्माण करत आहे.या प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचे संपूर्णता श्रेय राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक मुस्ताक शेख माजी नगरसेवक दत्तात्रय खवळे यांना जाते. नव्याने झालेल्या आरक्षणा नुसार या प्रभागातून पुन्हा दत्तात्रय खवळे हेच निवडणूक लढवण्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्याचबरोबर या प्रभागातून सर्वसाधारण महिला प्रवगासाठी आरक्षण झाल्यामुळे पक्षश्रेष्ठी मुस्ताक शेख यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी देणार की मुस्ताक शेख हे कार्यकर्त्यांना संधी देणार याबाबतची उत्सुकता या पूर्वीपासूनच ताणली गेली आहे.प्रभागाचा विकास करणाऱ्या या नगरसेवक जोडीच्या कामाचा झंझावात संपूर्ण मोहोळ शहरात चर्चेला जात आहे हे मात्र नक्की.



मोहोळ शहराच्या पूर्व भागातील महत्त्वाचा प्रभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन प्रभाग रचनेनुसार झालेल्या प्रभाग क्रमांक चार मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून नगर विकास विभागाकडे आणि माजी आमदार राजन पाटील, आमदार यशवंत माने, यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून ज्येष्ठ नेते शहाजान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील जवळपास सर्वच रस्ते अद्यावत काँक्रिटीकरणाने जोडले आहेत.

– **मुस्ताक शेख,** माजी नगरसेवक



गत नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक सहा मधील सुजाण नागरिकांनी मला नगरसेवक होण्याची अत्यंत महत्त्वाची अशी सुवर्णसंधी दिली. त्या संधीचे सोने करण्यासाठी सर्वप्रथम प्रभागातील सर्व अडचणींचा अभ्यास केला. मोहोळ नगरपरिषदेचे विकास मार्गदर्शक तथा माजी आमदार राजन पाटील, मोहोळचे विद्यमान आमदार तथा आम्हा नगरसेवकांचे मार्गदर्शक माजी आ.यशवंत तात्या माने, शहराचे विकास मार्गदर्शन शहाजान शेख, युवा नेते अजिंक्यराणा पाटील यांनी सुरुवातीपासून विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू दिली नाही. त्यामुळेच आज प्रभागाचा विकासात्मक चेहरामोहरा बदलू शकलो.

– **दत्तात्रय खवळे,** माजी नगरसेवक

# पीएनजी ज्वेलर्स तर्फे दिवाळीनिमित्त विशेष फेस्टिव्ह ऑफर्स

**सातारा (कटूसत्य वृत्त):-** भारतातील विश्वसार्ह संघटित कौटुंबिक ज्वेलर, पीएनजी ज्वेलर्सला आपल्या भव्य दिवाळी मोहिमेची घोषणा करताना आनंद होत आहे. ही मोहिम २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालेल. या मोहिमेमुळे ग्राहकांना अत्यंत आकर्षक किमतीत उत्कृष्ट दागिने घरी आणण्याची एक अनोखी संधी मिळणार आहे, ज्यामुळे हा सणासुदीचा काळ अधिक अविस्मरणीय बनेल यात शंका नाही.




या दिवाळी मोहिमेअंतर्गत, ग्राहक सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर ५० टक्के पर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १०० टक्के पर्यंत सूट तसेच जुने सोने बदलताना ० टक्के कपात या खास ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात. या ऑफर्स सर्व पीएनजी ज्वेलर्सच्या स्टोअर्समध्ये आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असतील, ज्यामुळे अतुलनीय कारागिरीचे कालातीत दागिने घेऊन सणासुदीचा आनंद साजरा करू इच्छिणाऱ्या दागिन्यांच्या शौकिनांसाठी सुलभता आणि सोय सुनिश्चित होईल.

या मोहिमेबद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, "दिवाळी हा प्रकाश, समृद्धी आणि एकत्र येण्याचा सण आहे. पिढ्यानपिढ्या पीएनजी ज्वेलर्सवर विश्वास ठेवणाऱ्या आमच्या ग्राहकांसोबत हा सण साजरा करण्याची ही आमच्यासाठी नेहमीच एक खास संधी असते. आमचे दागिने अधिक सुलभ बनवून, उत्तम मूल्य प्रदान करत, सणाचा आनंद पसरवण्याचा हा आमचा मार्ग आहे. परंपरा, सौंदर्य आणि परवडणाऱ्या किमतींचा परिपूर्ण संगम अनुभवण्यासाठी आम्ही आमच्या ग्राहकांचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत."

# श्री सिद्धेश्वर प्रशालेच्या मुलींच्या कबड्डी संघास उपविजेतेपद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या 17 वर्षे वयोगट शहर स्तरीय कबड्डी स्पर्धेत श्री सिद्धेश्वर प्रशालेच्या मुलींचा संघ उपविजेता ठरला.



सदर संघाचे कर्णधारपद जबीन मुल्ला हिच्याकडे होते तर तस्मिया पटेल, सौंदर्या कोणदे, दिव्या कोळी, मयुरी सोनकडे, श्रद्धा चाबुकस्वार, मोहिनी सोनकडे, अंकिता टिकूरे, स्नेहा सोनकडे, लक्ष्मी देवकाते, प्रतीक्षा माने, चतुर्थी विजापुरे या मुलींच्या संघाने ही कामगिरी केली.

जबीन मुल्ला या विद्यार्थिनीची विभागीय चाचणीसाठी निवड झाली आहे. या घवघवीत यशाबद्दल यशस्वी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक सिताराम भांड यांचे श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक तथा शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अण्णाराज काडादी, शालेय शिक्षण समितीचे सदस्य सिद्धाराम चाकोते, गुरुराज माळगे, शिवशंकर बिराजदार, समीर सलगर श्री सिद्धेश्वर शिक्षण संकुलाचे समन्वयक संतोष पाटील, प्रशालेचे मुख्याध्यापक काशिनाथ आकाशे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक महासिद्ध मेसे व प्रशालेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# शिवसेनेच्या वतीने साडी व पॅन्ट-शर्टचे वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सीना नदीकाठातील गावांना महापुरामुळे खूप नुकसान झाले असून शिवसेना पक्षाकडून वेळोवेळी मदत सुरूच असून मौजे वांगी ता. दक्षिण सोलापूर येथील महिलांची दिवाळी गोड व्हावी म्हणून "महाराष्ट्राच्या लाडक्या भावाकडून लाडक्या बहिणींना साडी व पुरुषांना पॅन्ट-शर्ट वाटप" करण्यात आले, याप्रसंगी शिवसेना ओबीसी सेल महाराष्ट्र राज्य अध्यक्ष बाळासाहेब किसवे, ओबीसी सेल राज्य सचिव गणेश जोशी, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे, जिल्हाप्रमुख अमरजी पाटील, ओबीसी जिल्हाप्रमुख प्रभाकर गायकवाड, ओबीसी महिला जिल्हाप्रमुख कृष्णाताई बिरादार, सुनंदाताई साळुंखे, अनिताताई गवळी, सागर सोलापूरे, साहेबण्णा तेग्गेळी, माजिद बागवान, वैभव जवळकोठे, ब्रह्मदेव गायकवाड, कुमार धुमाळ, नागेश माने, यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक व असंख्य लाडक्या बहिणी उपस्थित होते.

# सेवानिवृत्त शिक्षकांकडून ७ टन पशुखाद्य वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांकडून पूरग्रस्त गावातील मुक्या जनावरासाठी पशुखाद्य सोमवारी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम सो यांच्या हस्ते पशुधन अधिकारी विशाल येवले शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात येणार आहे

सिना भिमा नदीच्या खोऱ्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील गावांना पुराचा तडका बसल्याने मुक्या जनावर वैरणाअभावी दावणीवर उपाशी बसलेत जिल्ह्यातील व राज्यातील जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षक १,६०,००० रोख रक्कम गोळा करून ७ टन पशुखाद्य खरेदी करून मुक्या जनावरांना वाटप करणार आहेत सोमवारी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधीकारी कुलदीप जंगम साहेबांच्या दालना समोर ३ गावातील शेतकऱ्याना पशुखाद्य वाटप करणार आहेत अशी माहिती संयोजक शिवानंद भरले, सुभाष फुलारी, रमेश गायकवाड, मल्लिकार्जुन बडदाळ, काळप्पा सुतार यांनी दिली आहे

# चौधरी फौडेंशनच्या वतीने 'गीत रामायण'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चौधरी फौंडेशनच्या वतीने मंगळवार दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता जुळे सोलापुरातील विलासचंद्र मेहता शाळेच्या प्रांगणात "गीत रामायण" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे, अशी माहिती फौंडेशनचे संस्थापक चेतन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या अनेक वर्षापासून चौधरी फौडेशनच्या वतीने अनेक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. निरुपणकार विवेक घळसासी हे कथेच्या माध्यमातून निरूपण करणार आहेत. स्वरध्यास संगीत विद्यालय सोलापूरच्या रसिका कुलकर्णी व सानिका कुलकर्णी यांचा विशेष सहभाग असणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. सोलापूरकरांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन चौधरी फौंडेशनचे संस्थापक चेतन चौधरी यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस रसिका कुलकर्णी, जतीन कुलकर्णी, श्याम कांबळे, अनिकेत लांबतुरे आदी उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता,**

**यांत्रिकी विभाग, सोलापूर, कुमठा नाका, उजनी वसाहत, सोलापूर- ४१३ ००३.**

ई-मेल :-eemdsolapur@gmail.com दूरध्वनी क्र. (०२१७) २९९०७१४

**निविदा सूचना क्रमांक ०६ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहे. सविस्तर निविदा सूचना शासनाच्या http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

कामाचे नांव :- आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा क्र. २ येथील पंप क्र. २ च्या Squirrel Cage Induction Motor दुरुस्ती, पंपगृहातील खिडक्या बसविणे पंपगृहाची रंगरंगोटी करणे, पंपगृहाच्या आतील प्रकाश व्यवस्था करणे व पाईप लाईनवरील काही प्रमाणात असलेली पाणी गळती वेल्डिंगच्या सहाय्याने बंद करणे कामे.

जिल्हा :- सोलापूर

निविदेची किंमत रुपये :- रु.६३८४९३/-

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक-१५/१०/२०२५ (सकाळी ११ पासून) ते दिनांक-२४/१०/२०२५ (दुपारी २.०० वाजता पर्यंत)

ई-निविदा उघडण्याचा :- दिनांक- २७/१०/२०२५ (दुपारी ४.०० वाजता)

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण ०५२३/(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७ / प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील.

खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

http://mahatenders.gov.in (सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवर कळविण्यात येईल.). निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यात्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.

जावक क्र./यां.वि.सोलापूर./लेखा-२/निविदा/१५८६/
सन २०२५.
कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग,सोलापूर यांचे कार्यालय
दिनांकः - ६/१०/२०२५.
जिमाका/सो/जाहि/१२९/२०२५-२६

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, सोलापूर**

# माळशिरस तालुक्यातील भाजपाचे नेतृत्व राम सातपुतेंकडेच- पालकमंत्री गोरे

**निमगाव (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील माने पाटील परिवार हा मूळचा म्हसवड येथील असून, माण तालुक्याशी त्यांची नाळ घट्ट असून, आपल्या उद्योग व्यवसायाशी प्रामाणिक असणारे सुजयसिंह माने पाटील हे माळशिरस तालुक्यात भाजपासाठी देखील तितकेच प्रामाणिकपणे काम करीत आहेत. माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली आगामी काळात भाजपासाठी प्रामाणिक काम करणाऱ्या कर्तुत्ववानांकडेच माळशिरस तालुक्यातील भाजपाचे नेतृत्व असेल असे राज्याचे ग्रामविकास, पर्यटन तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना जयकुमार गोरे यांनी बोलताना सांगितले.



ते अकलूज येथे अकलूजचे भाजपा मंडळ अध्यक्ष सुजयसिंह माने पाटील यांच्या निवासस्थानी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधताना बोलत होते यावेळी विचारपीठावर माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते, सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष फत्तेसिंह माने पाटील, शशिकांत उर्फ बाळासाहेब माने पाटील, हिंदुराव माने पाटील माळशिरस चे माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख, संजय देशमुख, महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, माने पाटील, माने देशमुख परिवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, आगामी काळ हा निवडणुकांचा काळ असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वच निवडणुकांमध्ये सर्वसामान्यांसाठी काम करणाऱ्या भाजपाला अग्रभागी ठेवण्याचे आवाहन केले.

माळशिरस भाजपात काही लोकांनी बंडाळीची आवई उठविल्यानंतर पालकमंत्री प्रथमच माळशिरस तालुक्यात आले होते. यावेळी माळशिरस भाजपाचे नेतृत्व कोण करणार? असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यानंतर माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्याकडे पाहत आगामी काळात निवडणुकांसाठी माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली माळशिरस तालुक्यातील सर्व निवडणुका लढवल्या जातील असे अधोरेखित केले यामुळे आगामी काळातील माळशिरस तालुक्यातील सर्व निवडणुका भाजपाच्या चिन्हावर माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली होणार असे संकेत त्यांनी दिले यावेळी हिंदुराव माने पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले प्रास्ताविक सुजयसिंह माने पाटील यांनी करून सर्वांचे स्वागत केले सूत्रसंचालन संतोष साठे तर आभार अमरसिंह माने देशमुख यांनी मानले.

माने पाटील परिवाराने गत लोकसभा व विधानसभा निवडणुकीत, भाजपासाठी अहोरात्र काम केले असून माळशिरस तालुक्यात माने पाटील परिवाराकडे श्रद्धेने व निष्ठेने पाहिले जाते. आपली श्रद्धा व निष्ठा व प्रामाणिकपणा अशी ओळख असणारा माने पाटील परिवार हा भाजपाच्या स्मरणात कायमच असेल यामुळे माने पाटील परिवारासोबत राज्याचे मुख्यमंत्री, पालकमंत्री व स्वतः राम सातपुते असतील.

**-राम सातपुते,**
माजी आमदार

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद आदर्श कन्या शाळा कसबे तडवळे येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न 9 ऑक्टोबर 2025 रोजी पाचवी शिष्यवृत्ती धारक 31 विद्यार्थी व मंथन परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत चमकलेल्या सर्व 45 विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शाळेत आयोजित करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा स्काऊट मेळाव्यामध्ये उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल शाळेच्या स्काऊट गाईड पथकाचाही सत्कार करण्यात आला. तसेच शाळेतील सहशिक्षिका ढोणे यांचा संपर्क फाऊंडेशनच्या वतीने आयडियल टीचर पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वरिष्ठ अधिव्याख्याता मिसाळ,अधिव्याख्याता अघोर, जिल्हा परिषदेचे वरिष्ठ विस्तार अधिकारी जंगम, सरपंच स्वातीताई जमाले,उपसरपंच हरून शेख, शा.व्य.स. अध्यक्ष सोमनाथ भोसले, सदस्य सुभाष धनके, शुभांगी करंजकर, देवकन्या जमाले,मनीषा दिघे, केंद्रप्रमुख जाकते, केंद्र शाळा तडवळेचे मुख्याध्यापक नदाफ तसेच सहशिक्षक बाळासाहेब जमाले, जमाले, चांडगे व गावातील शिक्षण प्रेमी नागरिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला शिक्षक ढवळे व गीत मंच मधील मुली यांनी स्वागत गीत गाऊन सर्व उपस्थितांचे स्वागत केले. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक सय्यद यांनी केले, तर प्रस्ताविक शाळेचे मार्गदर्शक ,ज्येष्ठ शिक्षक जगनाथ धायगुडे यांनी केले. यावेळी या कार्यक्रमासाठी पालकांनी वीस हजार रुपये तर शाळेला साऊंड सिस्टिम घेण्यासाठी पंधरा हजार रुपये देणगी यावेळी घोषित केली. गुणवंत विद्यार्थ्यांना यावेळी सुमारे 50 हजार रुपयांची बक्षिसे पालकांतर्फे वाटप करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ताकपिरे व मते यांनी केले तर आभार प्रदर्शन पवार आर आर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक तनमोर, देशटवाड सर, सर्व शिक्षक व पालक यांनी परिश्रम घेतले.




(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार- *** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 77

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 5 | | 8 | 4 |
| | | 1 | 9 | | 6 | | | |
| | 4 | 9 | 7 | 2 | | 6 | | 3 |
| | | 5 | 2 | | 9 | | | |
| 9 | 2 | | 4 | 7 | | | | 1 |
| | 6 | 3 | 5 | | 1 | | 2 | |
| 1 | | | 6 | | | | | 2 |
| | 8 | 4 | | 5 | | | 9 | 6 |
| | 9 | 6 | | 1 | | 7 | | 5 |

# नवीन चेंबर दालनाचा पाटील यांच्या हस्ते शुभारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील सोहळे गावचे सुपुत्र ॲड. महेश जगताप यांच्या सोलापूर जिल्हा न्यायालय आवारातील नवीन चेंबर दालनाचा शुभारंभ राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील यांच्या शुभहस्ते नुकताच संपन्न झाला.

या प्रसंगी सोलापूर जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर, कायदे व्यवसायाशी संबंधित वरिष्ठ वकील, सहकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला उत्साहवर्धक आणि आपुलकीचा माहोल लाभला.

राजन पाटील यांनी शुभारंभ प्रसंगी बोलताना ॲड. महेश जगताप यांच्या कार्यनिष्ठेचे कौतुक केले. 'गावागावातील तरुणांनी शिक्षण, संघर्ष आणि प्रामाणिकतेच्या जोरावर न्यायव्यवस्थेत योगदान द्यावे, हीच खरी समाजसेवा आहे,' असे ते म्हणाले.

ॲड. महेश जगताप यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानत सांगितले की, ह्या नवीन चेंबरद्वारे अधिकाधिक लोकांपर्यंत न्याय आणि सल्ला पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल.'

यावेळी तानाजी गुंड, अनिल कादे व प्रकाश चवरे उपस्थित होते.

# प्रभाग क्रमांक १ सर्वसाधारण खुला झाल्याने दिग्गज इच्छुकांमध्ये चुरस वाढली

## राष्ट्रवादीकडून उमेदवारीसाठी सुदर्शनभाऊ गायकवाड पक्षश्रेष्ठींना भेटणार

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या अनेक वर्षापासून शिवसेना पक्षाच्या ताब्यात असणाऱ्या प्रभाग क्रमांक 1 चे आरक्षण सोडत सर्वसाधारण पुरुष आणि इतर मागास प्रवर्ग महिल झाल्याने या प्रभागातून अनेक दिग्गज उमेदवारांची नावे समोर येताना दिसतायेत. या नगरपरिषद निवडणुकीत काहीही झालं प्रभाग एक मधूनच उमेदवारी घेऊन निवडणूक लढवायची असा निर्धार अनेकांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून युवा नेते सुदर्शन भाऊ गायकवाड यांचे नावाचीही चर्चा जोरात सुरू आहे.



कोविड कालावधी पूर्वी निवडणूक जाहीर झाल्यानंतर सुदर्शन भाऊ गायकवाड यांनी पक्षश्रेष्ठी तथा माजी आमदार राजन पाटील, बाळराजे पाटील अजिंक्यराणा पाटील यांची भेट घेऊन पूर्वीच्या 11 म्हणजे नव्याने झालेल्या प्रभाग १ मधून राष्ट्रवादी पक्षाकडून उमेदवारीची संधी देण्याची मागणी केली होती. या शिवाय प्रभागातील गेल्या अनेक वर्षापासून संपर्क असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून देखील सुदर्शन भाऊ गायकवाड यांनाच उमेदवारी मिळण्याचे संकेत आहेत.

प्रभागातील विविध अडीअडचणी प्रभावीपणे शासन दरबारी मांडून त्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुदर्शन भाऊ गायकवाड यांनी आजवर केला आहे. अनेक ठिकाणी बोअर मारून पाण्याची सोय केली तर आवश्यक त्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर स्वखर्चातून उभे करून शेतीपंपाच्या विजेचा प्रश्न सोडविला आहे. त्यामुळे सुदर्शन गायकवाड यांची उमेदवारी सध्या जमेची बाब या प्रभागातील अनेकांना वाटत आहे. त्यामुळे गायकवाड यांनाच उमेदवारी द्यावी यासाठी प्रभागातील एक शिष्टमंडळ महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील यांना भेटणार असल्याचे समजते.

सुदर्शन भाऊ गायकवाड हे अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटन संघटनेचे जिल्हाध्यक्ष आहेत. त्यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान देखील मोठे आहे. रक्तदान शिबिर, वृक्षारोपण शिबिर, त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि छत्रपती संभाजी महाराज जयंती दरम्यान विविध सामाजिक आणि प्रबोधनपर उपक्रम राबविण्याचे कार्य त्यांनी मोहोळ शहरासह संपूर्ण जिल्ह्यात केले आहे.

दरवर्षी आपला वाढदिवस अत्यंत साधेपणाने साजरा करत त्यांनी धान्य वाटप त्याचबरोबर कोरोना काळात स्वखर्चातून त्यांनी निर्जंतुकीकरण फवारण्या करून शहरवासीयांना दिलासा दिला. छावा संघटनेच्या माध्यमातून विविध प्रश्नावर आंदोलने करत प्रशासनाचे लक्ष वेधत सदरचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. प्रभागामध्ये सुदर्शन गायकवाड यांची चांगली क्रेझ असुन शहरातील एक कुशल युवा संघटक म्हणून सुदर्शन भाऊ गायकवाड यांच्याकडे पाहिले जाते. प्रचंड जनसंपर्क आणि समाजकार्याची आवड या सुदर्शन गायकवाड यांच्या जमेच्या बाजू आहेत.

# कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब ह्यकुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत न्यासाकडून सप्टेंबर महिन्यातील ७७ कीटचे वाटप करण्यात आले.

तालुक्यातील जे पैलवान कुस्ती सरावासाठी कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी आहेत अशा कुस्तीगरांसाठी न्यासाकडून गत मकर संक्रांतीच्या दिवशी (जानेवारी महिन्यात) सदरचा उपक्रम सुरू करण्यात आला होता. प्रारंभी ५० जणांना किट देण्यात आले होते. गेली ३८ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे स्वामीकार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या कार्यास झळाळी प्राप्त झाली आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

याबरोबरच 'समर्थ महाप्रसाद' सेवे बरोबरच आता तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने आदि पदार्थाचे कुस्तीगरांसाठी श्रींचा प्रसाद रुपी खुराकात या जीनसांचा समावेश आहे. तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माद्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७७ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै.महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी न्यासाचे सचिव शामराव मोरे, मैनुद्दीन कोरबू, बाळासाहेब पोळ, गोटू माने, प्रवीण घाटगे, शहाजी यादव, एस.के. स्वामी, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, शिव स्वामी, राजेंद्र झंपले, मलंग मकानदार, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, रोहित कदम, पिंटू हळ्ळूरे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

**शहराच्या दक्षिण भागात राजकीय हालचाली वाढल्या**

# प्रभाग १० मधून लेंगरे परिवारातील सारिका सागर लेंगरे यांच्या उमेदवारीची चर्चा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या दक्षिण हद्दवाढ भागात झपाट्याने विकासाच्या दिशेने आगेकूच करणाऱ्या प्रभाग क्रमांक दहा मधून निवडणूक लढविण्यासाठी भाजपचे युवा नेते सागरदादा लेंगरे आणि लेंगरे परिवाराने मोठी पूर्वतयारी सुरू केली आहे. यापूर्वी सोळा आणि सतरा या प्रभागांचा संयुक्त समावेश होऊन नव्याने निर्माण झालेल्या प्रभाग दहा मध्ये सर्वसाधारण आणि ओबीसी महिला आरक्षणाची सोडत निघाल्यामुळे ओबीसी महिला प्रवगार्तून सागरदादा लेंगरे यांच्या सुविद्य पत्नी सारिका सागर लेंगरे या निवडणूक लढण्याचे जवळपास निश्चित झाल्याचे बोलले जात आहे.





यशस्वी युवा उद्योजक तथा युवा नेते सागरदादा लेंगरे हे विविध क्षेत्रातील सक्रियतेमुळे मोहोळ तालुक्याच्या आणि शहराच्या विविध समाज घटकांशी गेल्या अनेक वषार्पासून संपर्कात आहेत. मात्र सोशल मीडिया सेलच्या माजी जिल्हाध्यक्षपदाची धुरा त्यांनी सांभाळल्यामुळे प्रभावी प्रचार यंत्रणा आणि संपर्कस्थाने बळकट करण्यामध्ये त्यांचा मोठा हातखंडा आहे. सागर लेंगरे यांच्या सुविद्य पत्नी सारिका लेंगरे यांच्या उमेदवारीमुळे गेल्या अनेक वर्षापासूनचा बालेकिल्ला असलेल्या भाजपच्या या प्रभागातील राजकारण आणखी जास्त ढवळून निघणार आहे.

भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सुशील भैय्या क्षीरसागर यांचे निकटचे सहकारी असणारे सागरदादा लेंगरे हे भारतीय जनता पक्षात गेल्या पंधरा वषार्पेक्षा जास्त कालावधीपासून सक्रिय पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमारभाऊ गोरे, भाजपाचे माजी मंत्री तथा ज्येष्ठ नेते आ.सुभाषबापू देशमुख, आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण या नेतेमंडळींच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करणाऱ्या सागर लेंगरे आणि त्यांचे लहान बंधू युवा उद्योजक समाधान लेंगरे प्रभागातील जनसंपर्क गेल्या नऊ वर्षापासून कायम ठेवला आहे. शिवाय या प्रभागात त्यांच्या परिवाराचा कौटुंबिक नातेसंबंधाचा स्नेह विस्तृत असल्यामुळे त्यांच्या संपर्क सातत्याचा मोठा फायदा त्यांच्या विजयासाठी त्यांना होणार आहे. शिवाय या प्रभागातून यापूर्वीचे प्रभाग सोळाचे नगरसेवक तथा युवा नेते सुशील भैय्या क्षीरसागर हे देखील निवडणूक लढवणार असल्याने सुशील भैय्या क्षीरसागर आणि सागरदादा लेंगरे या दोन युवा नेत्यांच्या जोडीमुळे या प्रभागातील भाजपा महायुतीचे पारडे आणखी जड होणार आहे.

# व्हि. आर. पवार मध्ये महिलांची प्रचंड गर्दी - राजेश पवार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** युवती मध्ये साड्यांची क्रेझ सध्या वाढलेली दिसत आहे पारंपरिक साड्यांनाच आधुनिक लुक देणाऱ्या काठपदर साड्यांची क्रेज आजही युवतीमध्ये प्रचंड लोकप्रिय असताना दिसत आहे. आणि त्यात डिझाईन वर्कच्या साड्या आल्या. ब्रायडल शालू, रेशमी, सिल्क आणि प्रिंटेड साड्यांची लोकप्रियता आजही युवती मध्ये कायम असल्याचे राजेश पवार यांनी सांगितले.



चाटी गल्ली येथील व्ही आर पवार यांच्या शोरूम मधील ही आजची गर्दी आहे ती दिवाळी आणि लग्न बस्ता खरेदीची, कारण तरुणींना पारंपारिक साड्यांना आधुनिक टच दिलेला डिझाईन हवा असतो त्यांच्या मनातील साडी ही फक्त व्हि.आर. पवार यांच्याकडेच मिळते अशी खात्री तरुणींना वाटतो त्यामुळेच मोठ्या प्रमाणात गर्दी होत असताना दिसत आहे.

खास करून व्हि. आर. पवार यांच्याकडे सुटिंग – शर्टींग, धोतर, नवरीचा शेला, परकर, घुंगट यासह आहेराच्या साड्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. महत्त्वाचे म्हणजे जरी, काठपदर, पैठणी, वर्क साडी पोटा गदवाल इरकल या साड्या सह ब्रायडल शालू आणि रेशमी साड्या सहा हजारापासून उपलब्ध आहे.

गर्दी टाळण्यासाठी व आवडीची साडी घेण्याकरिता तसेच लग्नाचा बस्ता खरेदीसाठी सोलापूर, लातूर, धाराशिव येथील आमचे आदरणीय ग्राहकांनी सकाळी 11 वाजताच यावे असे आवाहन अमर पवार, महेश पवार, गिरीश पवार यांनी केले आहे.

# सुरेश पाटोळे यांना 'समाजभूषण पुरस्कार' प्रदान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इंदिराबाई गायकवाड चॅरिटेबल ट्रस्ट, नवी मुंबई यांच्या वतीने सोलापूर येथील मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते आणि क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे यांना 'समाजभूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सुरेश पाटोळे यांनी अनुसूचित जातीतील अ, ब, क, ड आरक्षण वर्गीकरणासाठी केलेल्या उल्लेखनीय कायार्ची दखल घेऊन प्रदान करण्यात आला.




सुरेश पाटोळे हे मागील २५ वर्षापासून मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक उन्नतीसाठी निस्वार्थपणे कार्यरत आहेत. त्यांनी लष्कर येथे 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय' स्थापन केले आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम राबवले जातात.

सोलापूर शहरात साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पूणार्कृती पुतळा बसवण्यासाठीही सुरेश पाटोळे यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच ते दरवर्षी मोफत आरोग्य शिबिर, नेत्ररोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करतात. सामुदायिक विवाह आयोजन व इतर सामाजिक उपक्रम राबवित असतात,मातंग समाजावर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध त्यांनी निवेदने, मोर्चे आणि आंदोलने यांच्या माध्यमातून वेळोवेळी आवाज उठवला आहे.

या पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि रोख २१००/– असे होते. हा पुरस्कार नवी मुंबईचे पालकमंत्री गणेश दादा नाईक यांच्या उपस्थितीत व थोर विचारवंत शरदकुमार ढोले साहेब यांच्या हस्ते,संस्थेचे अध्यक्ष दिलीपकुमार राजेंद्र गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण समारंभ 8/10/2025 बुधवारी विष्णुदास भावे सभागृह, वाशी, नवी मुंबई येथे संपन्न झाला.

# आशा-गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीची आरोग्यमंत्र्यांसोबत सविस्तर चर्चा



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य आशा–गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीच्या शिष्टमंडळाची राज्याचे आरोग्यमंत्री मा. प्रकाश अबिटकर, आरोग्य सेवा आयुक्त तथा संचालक मा. कादंबरी बलकवडे, सहसंचालक (अ. तांत्रिक) मा. राजेंद्र भालेराव आणि राज्य समन्वयक स्वाती पाटील यांच्या सोबत सविस्तर बैठक पार पडली. या बैठकीत विविध प्रलंबित मागण्यांबाबत शासन सकारात्मक असल्याचे कृती समितीने सांगितले.

बैठकीत आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी आशा व गटप्रवर्तकांना भाऊबीज भेट देण्याच्या प्रस्तावावर मंत्रिमंडळ पातळीवर लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच, गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यासाठीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवून त्याचा पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

आरोग्य आयुक्त कादंबरी बलकवडे यांच्या दालनात झालेल्या चर्चेत मोबाईल रिचार्ज भत्ता १०० वरून वाढवून ३०० करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच नवीन मोबाईल देण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्याचे निर्देश देण्यात आले.सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करण्याबाबत मागील आदेश पुनर्विचारात घेण्यात येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. गटप्रवर्तकांसाठी एकसमान रंगाचा गणवेश देण्याबाबत चर्चा झाली. ऑनलाइन कामाबाबत 'सक्ती नाही' असे स्पष्ट करण्यात आले असून, इतर विभागाकडून लावण्यात येणाऱ्या ऑनलाईन कामांविषयी संबंधित विभागांशी आयुक्त स्तरावर पत्रव्यवहार केला जाईल, असे आश्वासन देण्यात आले. तसेच, थकीत मानधन त्वरित देण्यासाठी आणि 'लाडकी बहिण' योजनेंतर्गत नोंदणी केलेल्या आशांना मोबदला मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. बायोमेट्रिक हजेरीची सक्ती रद्द करण्यात आली असून, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर दररोज हजेरी लावण्याची जबाबदारी राहणार नाही, असा दिलासा कृती समितीला मिळाला.

आरोग्यमंत्री, प्रधान सचिव आणि आयुक्त यांच्या स्तरावर लवकरच सर्वसमावेशक बैठक घेऊन सर्व प्रश्न मार्गी लावले जातील, असे आश्वासन देण्यात आले. तसेच, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्याचे मानधन पुढील तीन दिवसांत जमा होणार, असे सांगण्यात आले. आरोग्य विभागात आशा व गटप्रवर्तकांना सन्मानाची वागणूक देण्यासाठी आदेश काढले जाणार आहेत.

यानंतर कृती समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर तसेच संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

या शिष्टमंडळात कॉ. राजू देसले, भगवान देशमुख, पुष्पा पाटील, आरमायटी इराणी, ज्योती उराडे, सिद्धाराम उमराने, रुपाली दोरकर, शाहीन शेख, मंगल वावरगिरे आदी उपस्थित होते.राज्यभरातून हजारो आशा व गटप्रवर्तकांनी या आंदोलनात सहभाग नोंदवला. सोलापूर जिल्ह्यातील तब्बल दोन हजारांहून अधिक आशा व गटप्रवर्तक उपस्थित होत्या.

# गावाच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणार- खा. प्रणिती शिंदे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील पूरग्रस्त शिवणी गावाला भेट देऊन शेतकरी आणि ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी ग्रामस्थांनी खासदार शिंदे यांच्यासमोर आपली व्यथा मांडताना सांगितले की, अलीकडील पुरामुळे गावातील शेतकरी आणि ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेती, घरे, जनावरे आणि पिकांचे नुकसान होऊन लोकांवर आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे गावाचे पुनर्वसन करण्यात यावे आणि शासनाने जाहीर केलेली मदत तुटपुंजी असल्याने ती वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. तसेच सांगलीप्रमाणे नदीकाठच्या गावातील शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर करावे, अशीही मागणी करण्यात आली.

खासदार प्रणिती शिंदे यांनी ग्रामस्थांच्या मागण्यांकडे गांभीयार्ने लक्ष देत सांगितले की, 'शिवणी गावाचे पुनर्वसन करण्यासाठी मी ठोस प्रयत्न करणार आहे. शासनाने जाहीर केलेली मदत अत्यंत अपुरी आहे. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून वाढीव आर्थिक मदतीची मागणी आम्ही सातत्याने करणार आहोत,' असे त्या म्हणाल्या.

पूरग्रस्तांच्या समस्या तत्काळ सोडवून मदत कार्य वेगात सुरू करण्याची मागणी खासदार शिंदे यांनी प्रशासनाकडे केली.

यावेळी सरपंच शशिकांत खवसोडे, सचिन गुंड, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, राजकुमार गुंड, अशोक गुंड, रायबा गुंड, अशोक गुंड, लखन गुंड, विष्णू गुंड, रुक्मत गुंड, नारायण कायत, गौतम खवसोडे, सरूबाई खवसोडे यांच्यासह शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऑर्किडच्या शिक्षकांसाठी सीबीएसई शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील नामांकित अशी सीबीएसई स्कुल म्हणून नावलौलिक प्राप्त झालेल्या नागेश करजगी ऑर्किड स्कुल मध्ये शिक्षक वगार्साठी सीबीएसई कडुन 'ज्ञानाचे सिद्धांत' या विषयावर प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होत या प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन संगमेश्वर पब्लिक स्कुलच्या प्राचार्या प्रियांका समुद्रे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी स्कुलच्या प्राचार्या रुपाली हजारे, अक्षता रायकर उपस्थित होते.

सदर प्रशिक्षण शिबिरात स्कुलमधील 60 शिक्षकांनी सहभाग नोंदविला.यामध्ये प्रमुख मार्गदर्शिका प्रियांका समुद्रे व अक्षता रायकर यांनी ज्ञान व शिक्षण या दोन्ही मधील आधुनिक बदल याविषयी शिक्षकांना इत्थंभूत अशी माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी,संस्थेच्या सचिवा वर्षाताई विभुते, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी,स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांनी या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून शिक्षकांचे ज्ञान अद्ययावत ठेविण्यासाठी मदत केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीदेवी कनके यांनी केले. सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# प्रा. डॉ. बापूसाहेब आडसुळ यांना राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रा. डॉ. बापूसाहेब आडसुळ सदस्य मंत्रालय समन्वय समिती मुंबई,सदस्य पुणे बोर्ड, संस्थापक श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था सोलापूर यांना



भारत सरकार यांचे वतीने राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे राज्याचे प्रमुख मंगेश चिवटे,डॉ गणपतराव मोरे विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे,औदुंबर उकिरडे पुणे बोर्ड अध्यक्ष, सचिन जगताप शिक्षणाधिकारी माध्यमिक सोलापूर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

प्रा डॉ बापूसाहेब आडसुळ यांनी गेली वीस वर्षे अनेक शैक्षणिक, सामाजिक कार्यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन जिल्हा परिषद, पुणे उपसंचालक,मुंबई मंत्रालय येथे

अनेक शिक्षक बांधवांना न्याय मिळवून दिले आता पर्यंत 2000 शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित केले या सर्व बाबींचा विचार करून त्यांना भारत सरकार यांचे वतीने राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला या बद्दल राज्यामध्ये सर्व स्तरामधून कौतुक करून शुभेच्छा वर्षा होत आहे.